## BOMBAY ACT No. XII OF 1957.

AN ACT TO PROVIDE FOR THE VACATION BY A PERSON WHO IS CHOSEN A MEMBER OF BOTH HOUSES OF LEGISLATURE OF THE STATE OF BOMBAY OF HIS SEAT IN ONE HOUSE OR THE OTHER.

## सन १९५७ चा मुंबई अधिनियम १२ वा.

[ राज्यपाल यांची संमति मिळाल्यानंतर "मुंबई राजपत्रांत" तारीख ३० माहे मार्च सन १९५७ रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला. ]

**मुंबई राज्याच्या विधानमंडळाच्या दोन्हीं सदनांचा सदस्य म्हणून निवडण्यांत आलेल्या इसमानें कोणत्या तरी एका सदनांतील आपली जागा रिकामी करण्यासाठीं तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, भारताचें संविधान याच्या १९० व्या अनुच्छेदास अनुसरून, मुंबई राज्याच्या विधानमंडळाच्या दोन्ही सदनांचा सदस्य म्हणून निवड झालेल्या इसमानें कोणत्या तरी एका सदनांतील आपली जागा रिकामी करण्यासाठीं तरतूद करण्याची आवश्यकता आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या आठव्या वर्षी यावरून पुढील-प्रमाणें अधिनियम केला आहे :—

१. या अधिनियमास मुंबईचा एकाच वेळीं दोन सदनांचे सदस्य असण्यास प्रति-बंध करण्याबाबत अधिनियम, १९५७, असें म्हणावें. लघु संज्ञा.

२. (१) ज्या कोणत्याहि इसमास मुंबई विधानसभा व मुंबई विधानपरिषद या दोहोंचा सदस्य म्हणून निवडण्यांत आलें असेल आणि ज्यानें त्यांपैकीं कोणत्याहि सदनांत आपली जागा स्वीकारली नसेल अशा इसमास, त्यानें सही केलेल्या आणि मुंबई विधानसभेचा सभापति व मुंबई विधानपरिषदेचा अध्यक्ष यांस, किंवा त्या संबंधांत सभापतीनें किंवा अध्यक्षानें अधिकृत केलेल्या इसमास दिलेल्या लेखी नोटिशीद्वारें, त्यास अशा रीतीनें निवडण्यांत आल्याच्या तारखेपासून किंवा तारखांपैकीं उशिरांच्या तारखेपासून दहा दिवसांच्या आंत उक्त सदनांपैकीं कोणत्या सदनाचा सदस्य असण्याची त्याची इच्छा आहे तें कळविलें पाहिजे, आणि त्यानंतर ज्या सदनांत सदस्य असण्याची त्याची इच्छा असेल त्या सदनाव्यतिरिक्त दुसऱ्या सदनांतील त्याची जागा रिकामी होईल. राज्य विधान-मंडळाच्या दोन्ही सदनां-वर निवडण्यांत आला असतां जागा रिकामी करणें.

(२) उपरोक्त मुदतीच्या आंत असें कळविण्यांत कसूर झाल्याच्या बाबतींत, ती मुदत संपल्यावर, मुंबई विधानपरिषदेंतील त्याची जागा रिकामी होईल.

(३) पोट-कलम (१) अन्वयें कळविलेली कोणतीहि माहिती अखेरची असेल व ती मागें घेतां येणार नाहीं.

राज्य विधानमंडळाच्या एका सदनाचे आधींच सदस्य असलेल्या इसमांनीं त्याच्या दुसऱ्या सदनावर निवडून आल्यावर जागा खालीं करणें.

३. (१) जो इसम मुंबई विधानसभेचा आधींच सदस्य असून ज्यानें त्या सदनांत आपली जागा स्वीकारली असेल त्या इसमास जर, मुंबई विधानपरिषदेचा सदस्य म्हणून निवडण्यांत आलें असेल तर, तो ज्या तारखेस अशा रीतीनें निवडण्यांत आला असेल त्या तारखेपासून मुंबई विधानसभेंतील त्याची जागा रिकामी होईल.

(२) जो इसम मुंबई विधानपरिषदेचा आधींच सदस्य असून ज्यानें त्या सदनांत आपली जागा स्वीकारली असेल त्या इसमास जर, मुंबई विधानसभेचा सदस्य म्हणून निवडण्यांत आलें असेल तर,—

(अ) तो एखाद्या पोट-निवडणुकींत अशा रीतीनें निवडण्यांत आला असेल त्या बाबतींत, तो ज्या तारखेस अशा रीतीनें निवडण्यांत आला असेल त्या तारखेस, आणि

(ब) तो सार्वत्रिक निवडणुकींत अशा रीतीनें निवडण्यांत आला असेल त्या-बाबतींत, लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या ७३ व्या कलमाअन्वयें ज्या तारखेस नवीन विधानसभेची रचना करण्यांत आली असेल त्या तारखेच्या लगत-पूर्वीच्या तारखेस,

मुंबई विधानपरिषदेंतील त्याची जागा रिकामी होईल.

ज्या तारखेस कलमें २ व ३ यांच्या प्रयोजनांसाठीं एखाद्या इसमास निवडण्यांत आलें असेल त्या तारखेचा अर्थ.

४. कलमें २ व ३ यांच्या प्रयोजनांसाठीं, राज्याच्या विधानमंडळाच्या कोणत्याहि सदनाचा सदस्य म्हणून एखाद्या इसमास ज्या तारखेस निवडण्यांत आलें असेल ती तारीख, निवडून दिलेल्या सदस्याच्या बाबतींत, लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याअन्वयें त्यास अशा रीतीनें निवडण्यांत आलें आहे असा जाहीरनामा राजपत्रांत प्रसिद्ध केल्याची तारीख आणि नामनियुक्त केलेल्या सदस्याच्या बाबतींत, त्याची नियुक्ति राजपत्रांत प्रसिद्ध केल्याची तारीख असेल.

सन १९५०चा मुंबईचा अधिनियम १०वा रद्द करणें.

५. मुंबईचा एकाच वेळीं दोन सभागृहांचे सदस्य असण्यास मनाई करण्याबाबत अधिनियम, १९५० हा रद्द करण्यांत येत आहे.

(True translation)

D. T. MUZUMDAR,
Examiner of Books and Publications, Bombay.